# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २८४** **दिनांक :- ०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.११/०७/२०१२५ शुक्रवार रोजी सकाळी -११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५० चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय** :- दि.११/०७/२०१२५ शुक्रवार रोजी सकाळी -११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५० चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.११/०७/२०१२५ शुक्रवार रोजी सकाळी -११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५० चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-२८५** **दिनांक :-०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/३७/२०२५-२६ दि.२४/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.१४/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१७/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि. १७/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेसाठी मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.०७/०७/२०२५ चे रिपोर्टनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ४४६५ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४११५ दि.०७/०७/२०२५ अन्वये १२००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.३०/०५/२०२५ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/१७ दि.०७/०७/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-२८६** **दिनांक :- ०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/४०/२०२५-२६ दि.२५/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.१८/०३/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.२०/०३/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२५/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि. २५/०७/२०२५ चा अभिप्राय.
७. निविदा समितीचा दि.२७/०५/२०२५ चा निर्णय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका आरोग्य विभागासाठी (Hydralic Excavator) २१० -०१ नग खरेदी करण्याकामी Gem Portal वर दि.१२/०९/२०२४ रोजी Bid No – Gem/२०२४/B/५३९३०२८ नुसार L१ निविदाकार रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद यांचे निविदेतील आलेले दर रक्कम रु.६५,११,०००/- मात्र स्विकृत करण्यास मान्यतेस्तव सादर.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

आरोग्य विभागासाठी (Hydralic Excavator) EX २१० LC Super Plus with Piping Kit -०१ नग खरेदी करणे कामी Gem Portal वर दि.१२/०९/२०२४ रोजी Bid No – Gem/२०२४/B/५३९३०२८ Portal वर निविदा अपलोड करण्यात आलेली होती. विहित केलेल्या मुदतीत खालील प्रमाणे ०३ निविदा धारक अनुक्रमे १) रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद, २) सिध्दार्थ ऑटो इंजि.प्रा.लि.पुणे, ३) जे.सी.बी. इंडिया लि.हरियाणा यांनी सहभाग नोंदविलेला होता.

वरील ०३ निविदा धारक यांचा लिफाफा क्र.०१ (तांत्रिक दस्ताऐवज) पडताळणीअंती निविदा समिती/आयुक्त यांच्या मान्यतेने निविदाकारांचा लिफाफा क्र.०२ (Financial Bid) दि.१२/०३/२०२५ रोजी उघडण्यात आले असता आलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | आलेले दर | Rank |
|---|---|---|---|
| १ | रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद | ६५,११,०००/- | L१ |
| २ | सिध्दार्थ ऑटो इंजि.प्रा.लि.पुणे | ६६,५०,०००/- | L२ |
| ३ | जे.सी.बी. इंडिया लि.हरियाणा | ७०,००,०००/- | L३ |

दि.१२/०३/२०२५ रोजी लिफाफा क्र.०२ (Financial Bid) उघडण्यात आले असता त्यामध्ये रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांनी निविदेत दिलेले न्युनतम दर रक्कम रु.६५,११,०००/- आलेले आहेत. प्रकरणी सदर कामी अपेक्षीत रक्कम रु.६८,५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता प्राप्त झालेली असुन त्या अपेक्षीत खर्चाच्या रक्कमेशी आलेल्या दराशी तुलना केली असता आलेले दर कमीचे आहे. आलेले न्युनतम दर तसेच या दरानुसार येणाऱ्या पर्यायी एकुण रक्कम रु.६५,११,०००/- मात्र ला मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-२८७** **दिनांक :-०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/४१/२०२५-२६ दि.३०/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.१३/०५/२०२५ व दि.२४/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.१३/०५/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि. २८/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका आरोग्य विभागाकडील MH १९ CV २०२८, MH १९ CV २०२९ (Backhoe Loader) दुरुस्ती/ऑईल खरेदी बाबत आलेले दर रक्कम रु.९३,१९७/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार स्विकृत करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

आरोग्य विभागाकडील Backhoe Loader १) MH १९ CV २०२८, २)MH १९ CV २०२९ ची मागणी क्र.१५८१३, १५८०७, १५४४१, १५४५४ व टिप्पणी अहवालानुसार तांत्रिक तपासणी केली असता खालील प्रमाणे पार्टस व ऑईल खरेदी करणे आवश्यक आहे.

१) Kirloskar care premium Genuine oil १३ Liter + १३ Liter = २६ Liter
२) Spin on Lube oil Filter – १ Nos + १ Nos = २ Nos
३) Bosch No F००२ H२२ - १ Nos + १ Nos = २ Nos
४) Fuel Filter Element - १ Nos + १ Nos = २ Nos
५) Poly V Belt - १ Nos + १ Nos = २ Nos
६) Air Cleaner Assmbly - १ Nos + १ Nos = २ Nos
७) Feright Charger - १ Nos + १ Nos = २ Nos
८) Labour Charges All
९) Kirloskar Care premium Genuine Oil – ५ Liter
१०) Kirloskar Care Hydrolic Oil ६८ HLP – २१० Liter
११) Kirloskar Care Transmission Oil – १७ Liter X ३ = ५१ Liter
१२) Kirloskar Care Gear Oil ८५ W १४० – २० Liter X २ = ४० Liter

उपरोक्त नमुद पार्टस व ऑईल खरेदी Dhanshree Technocrats PVT. LTD Jalgaon यांच्याकडुन करणे कामी रक्कम रु.९३,१९७/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत आहे. सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नूसार स्थायी समितीच्या मान्यतेने Dhanshree Technocrats PVT. LTD Jalgaon यांना रक्कम रु.९३,१९७/- मात्रचा पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:-२८८** **दिनांक :- ०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/४४५/२०२५-२६ दि.२५/०७/२०२५
३. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.२६/०६/२०२५ चा अभिप्राय.
४. निविदा समितीचा निर्णय.

**विषय :-** गुंठेवारी अंतर्गत प्रभाग १४ मधील स.नं.२६६/१ आदित्य चौक ते मेहरुण स्मशानभुमी पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.विवेक प्रभाकर खर्चे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०.३००% कमीचे दर आल्याने सदर दरास व एकुण रक्कम रु.३५,७५,४९९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

गुंठेवारी अंतर्गत प्रभाग १४ मधील स.नं.२६६/१ आदित्य चौक ते मेहरुण स्मशानभुमी पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे कामास आयुक्त यांचे दि. १४/०१/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असता त्यास प्रशासक ठराव क्र.२३४ दि.१३/०२/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असुन सदर कामाची ई निविदा सुचना क्रं. ५८८ प्रसिध्द केल्यानुसार निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ सिलबंद निविदा पाकीटे सिलबंद पेटीत स्विकारुन सदरचे आलेले बंद पाकीटांची छाननी करण्यात आलेली असुन छाननी मध्ये निविदाधारक क्र.०१ एकविरा इंन्फ्रा व निविदाधारक क्र.०२ संदेश ज्ञानदेव टेकाडे अॅण्ड कंपनी यांनी भागीदारी फर्म नव्याने स्थापन झालेली आहे. सदर फर्मच्या स्थापने नंतर संबंधीतांनी सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव यांचेकडुन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. सदर नोंदणी प्रमाणपत्र देतांना सार्वजनिक बांधकाम विभागाने संदेश ज्ञानदेव टेकाडे अॅण्ड कंपनी या कंपनीस नोंदणी प्रमाणपत्र देतांना एकविरा इंन्फ्रा यांचे तसेच संदेश ज्ञानदेव टेकाडे अॅण्ड कंपनीच्या कंपनीस नोंदणी प्रमाणपत्र देतांना श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांनी केलेल्या कामांचे दाखले (Work done Certificate) व टर्न ओव्हर ग्राह्य धरुन नोंदणी प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यामुळे निविदाधारक क्र.०१ ते ०३ यांचे दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ३३,२५,९०७/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | एकविरा इंन्फ्रा | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | ३३,२५,९०७/- |
| २ | संदेश ज्ञानदेव टेकाडे अॅण्ड कंपनी | निविदा रक्कमेवर ५.५००% कमीचे दर | ३१,४२,९८२/- |
| ३ | श्री.विवेक प्रभाकर खर्चे | निविदा रक्कमेवर १०.३००% कमीचे दर | २९,८३,३३८/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.विवेक प्रभाकर खर्चे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १०.३००% कमीचे दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु.२९,८३,३३८/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा रक्कमेवर १०.३००% कमी दरा प्रमाणे येणारा अपेक्षीत खर्च रक्कम | २९,८३,३३८/- |
| ०२ | जि.एस.टी.१८% | ५,३७,००१/- |
| ०३ | कामगार विमा ०.५% | १४,९१७/- |
| ०४ | रॉयल्टी | ३६,३१३/- |
| ०५ | टेस्टींग | ३,९३०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ३५,७५,४९९/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. ३५,७५,४९९/-मात्र आहे. मात्र सदरचा खर्च गुंठेवारी निधी या लेखाशिर्षकाखाली मंजुर झाले असल्याने सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री.विवेक प्रभाकर खर्चे यांचे निविदा रक्कमेवर १०.३००% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:-२८९** **दिनांक :-०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य विभाग/४२६/२०२५-२६ दि.३१/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय
६. निविदा समितीचा निर्णय.
७. आयुक्त यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** GeM पोर्टलवर प्रस्तावीत १) Refuse Compactor (१४Cum) -२Qty, २)Fefuse Compactor (७Cum) -४Qty वाहने व गार्बेज बीन खरेदी करणे कामी एल-१ निविदाधारक Antony Motors Private Limited यांचे सोबत GeM पोर्टलवर करारनामा करुन कार्यादेश देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक अंतर्गत प्रस्तावीत GeM पोर्टलवर प्रस्तावीत १) Refuse Compactor (१४Cum) -२Qty, २)Refuse Compactor (७Cum) -४Qty वाहने खरेदी करणेस आयुक्त यांचे दि.२६/०५/२०२५ रोजी प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने उक्त कामाची online bidding क्रं. GEM/२०२५B/६३३०७७१ दि.१२/०६/२०२५ रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ WWW.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली असून GeM पोर्टलवर दि.१२/०६/२०२५ ते दि.२७/०६/२०२५ पावेतो विहित केलेल्या मुदतीत ०३ online Bid (ई-निविदा) खालील प्रमाणे प्राप्त झालेल्या आहेत.

| Sr.No. | Work / Item Description | Antony Motors Private Limited | MAK Envirotech and Solutions (INDIA)Pvt Limited | TPS Infrastrructure Limited |
|---|---|---|---|---|
| १. | GeM पोर्टलवर प्रस्तावीत १) Refuse Compactor (१४Cum) -२Qty, २) Refuse Compactor (७Cum) -४Qty वाहने व गार्बेज बीन ३ नग खरेदी करणे बाबत. | २,७३,३३,४००/- | २,९९,८५,२५०/- | ३,१७,१३,५००/- |
| | | L-१ | L-२ | L-३ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता L-१ Antony Motors Private Limited यांचे GeM पोर्टलवर१) Refuse Compactor (१४Cum) -२Qty, २) Refuse Compactor (७Cum) -४Qty वाहने व गार्बेज बीन ३ नग खरेदी करणेस रक्कम रु.२,७३,३३,४००/- मात्रचे सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले असून सदरचे दर स्विकृत करुन येणारा खर्च हा शासनामार्फत प्राप्त झालेल्या "Transfer Station" अनुदानातून करणेस तसेच Antony Motors Private Limited यांचे सोबत GeM पोर्टलवर संविदा करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र.:-२९०** **दिनांक :- ०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बालवाडी/पोषण आहार/४९/२०२५-२६ दि.३१/०७/२०२५
३. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील बालकांना सन २०२४-२५ चे शैक्षणिक वर्षाकरिता पोषण आहार पुरविणे कामी शासन पत्र क्र.शापोआ-२०२२/प्र.क्र.६४/एस.डी.३ दिनांक १३ मे २०२२ व महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार स्वतंत्र कक्ष प्रा. शिक्षण संचालनालय महाराष्ट्र पुणे/प्र.क्र./क.स्व./मसुदा/ २०२२-२३/ १११७/दिनांक १३ मे २०२२ प्रकरणी expression of interest या head खाली ही ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेस प्रस्तावास स्थायी समिती / प्रशासक यांची मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत राज्य शासनाच्या महिला व बाालविकास विभागाचे शासन निर्णय याचिका २०१९/प्र.क्र./का-५ दि.०३ एप्रिल २०१९ नुसार शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १२५ प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रतिबालक प्रति दिन रू.८.०० पैसे मात्रचा आहाराचा दर विहित केलेला आहे. शासन पत्र क्र.शापोआ-२०२२/प्र.क्र.६४/एस.डी.३ दि.१३ मे २०२२ व महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र कक्ष प्रा. शिक्षण संचालनालय महाराष्ट्र पुणे / प्र.क्र./क.स्व./मसुदा/२०२२-२३/१११७/ दि.१३ मे २०२२ प्रकरणी expression of interest या head खाली ई-निविदा सुचना क्र.५१७ करिताची प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई-निविदेतील सर्वसाधारण अटी व शर्तीनुसार लोकशाही महिला गृह उद्योग सह. संस्था, जळगांव या संस्थेस गुणवत्तेनुसार पोषण आहार पुरवठा करणेकामी बालवाडीतील बालकांना दैनंदिन पोषण आहार पुरवठ्याचे कार्यादेश क्र.जा.क्र./मबाक/२०९६/२०२४-२५ दिनांक २७/०९/२०२४ अन्वये देण्यात आलेला होता. कार्यादेशानुसार म.न.पा. संचलित बालवाडीतील बालकांना चांगल्या दर्जाचा उत्तम प्रतिचा पोषण आहार पुरवठा कोणत्याही प्रकारची एकही तक्रार न येवु देता सदर संस्थेने ६ महिने १५ दिवस पोषण आहार पुरवठा केलेला आहे.

या सन २०२५-२६ चे आर्थिक वर्षात अद्यापपावेतो शासनाच्या महिला व बालविकास विभागाने शासन निर्णयात शासकीय शालेय पोषण आहाराचे दरात कोणतीही दरवाढ सुचविलेली नसल्याने नव्याने सन २०२५-२६ करिता शासन निर्णय दिनांक ०३ एप्रिल २०१९ नुसार शालेय पोषण आहार प्रती दिन बालक प्रतिदिन रू.८.०० पैसे मात्रच्या आहाराच्या दर विहित निश्चित केलेले असल्याने पोषण आहाराचे पुरवठ्याच्या देयकात कोणतीही प्रतिमाह व एकुण वार्षिक खर्चात दरवाढ होत नसल्याने एक प्रकारे म.न.पा.ची यात आर्थिक बचतच होणार आहे. तसेच सन २०२५-२६ चे बालवाडी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू झालेले असल्याने बालवाडीतील बालकांना पोषण आहार पुरविणे क्रमप्राप्त असल्याने पोषण आहार पुरवठा कामी नव्याने निविदा प्रक्रिया न राबविल्यास प्रसिध्दीचे खर्चात सुध्दा यात बचत होणार आहे.

करिता एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय याचिका / २०१९/ प्र.क्र.५/का-५ दिनांक ०३ एप्रिल २०१९ नुसार शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १२५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रतिदिन बालक प्रतिदिन रू.८.०० पैसे मात्रचा आहाराचा दर विहित करण्यात आलेल्या दरात निविदेतील नमुद गुणवत्तेनुसार पोषण आहाराचा पुरवठा मागील वर्षाचे म्हणजे सन २०२४-२५ करिता मा. महासभा / प्रशासक ठराव क्र.१८४ दिनांक २७/०९/२०२४ ने मंजुर केल्याप्रमाणे या आर्थिक वर्षामध्ये म्हणजे सन २०२५-२६ करिता दैनंदिन पोषण

आहार पुरवठ्या प्रमाणे सदर दरमहाचा पोषण आहाराचा पुरवठा म.न.पा. संचलित मराठी माध्यमाच्या एकुण ९ बालवाड्या व सेमी इंग्रजी माध्यमाच्या एकुण १६ बालवाड्या मिळुन अशा एकुण २५ बालवाडीतील विद्यार्थ्यांची / बालकांची अंदाजित एकुण संख्या १३०० या प्रमाणे अशी असुन त्यानुसार वर्षाचे एकुण ३६५ दिवस त्यातुन उन्हाळीसुटी व इतर शासकीयसुट्या असे एकुण ६५ दिवस वगळुन वर्षातील एकुण ३०० दिवसांकरीता

१३०० बालवाडीतील बालक संख्या x प्रतिदिन ८.०० पैसे प्रती बालक आहाराचा दर या प्रमाणे १ दिवसाकरीता एकुण १०४००/- अंदाजीत अपेक्षित खर्च x एकुण ३०० दिवसाकरीता एकुण १२ महिन्यांकरीता येणारा अंदाजित / अपेक्षित वार्षिक खर्च एकुण रू.३१,२०,०००/- इतका होणार असुन सदरच्या पोषण आहाराच्या बिल अदायगिचा खर्च हा म.न.पा.चे अंदाजपत्रकीय म.बा.क. शिर्षकातील ५% राखीव निधीमधुन कारावा लागणार आहे. करिता सदरचा प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे

प्रस्तुत प्रकरणी जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील बालकांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता expression of interest या head खाली नवीन ई-निविदा मागविणेस व त्याच्या प्रसिध्दीस वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र.:-२९१** **दिनांक :-०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जशमनपा/पा.पु.वि./१०५/२०२५ दि.३१/०७/२०२५
३. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.२९/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. शहर अभियंता यांचा दि.२९/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.३०/०७/२०२५ चा अभिप्राय
६. मुख्यलेखापरिक्षक यांचा दि.३०/०७/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.३०/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** पाणी पुरवठा करणेकामी व्हॉलमन मजूरी मक्त्याने पुरविणे बाबत.

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत जळगांव शहरात पाणी पुरवठा करणेकामी व्हॉलमन पुरविणे कामी रक्कम रु.९,४३,३७५/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास आयुक्त यांची दि. १३/०३/२०२४ नुसार प्रशायकीय मान्यता मिळाली आहे. त्या अनुषगांने निवदेद्वारे भाव मागविले असता मक्तेदार मे.एस. के. कॉन्ट्रक्टर, सागरनगर, जळगांव यांचे दर अंदाजित रक्कमेवर १% जास्तने सर्वात कमीचे आले. तरी उक्त कामी मक्तेदार यांचे सर्वात कमीचे आलेले दरास आयुक्त यांचे कडील प्रशासकीय आदेश कं/पापुवि/१६५/ दि. १५/०३/२०२४ अन्वये मंजुरी मिळाली. त्यानुसार मक्तेदार यांना कार्यादेश क्र./पापुवि/१४१/दि. १५/०३/२०२४ नुसार देण्यात आला. त्यानुसार मुदतीत मजुर पुरविणेची कामे पूर्ण केले आहे. मुदतवाढीचा कालावधी ३० जून २०२४ पर्यंत समाप्त झाल्याने व मजुर पुरवठा करण्याच्या कामासाठी आवश्यक मान्यता व निविदा प्रक्रियासाठी कालावधी लागणार असल्याने पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवा लक्षात घेता दि. ०१/०७/२०२४ ते ३०/११/२०२४ या कालावधी पर्यंत ४ महिन्यासाठी कुठलीही दरवाढ न करता मुदतवाढ व पाणी पुरवठा विभागास २० मजुर त्यासाठी येणाऱ्या रु.१८१२१३२/- मात्रचे खर्चास आयुक्त यांनी दि.२४/०९/२०२४ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार पत्र क्रं./पापुवि/१६३/दि.२६/०९/२०२४ अन्वये मजुर पुरविणेकामी मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढीचा कालावधी ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत समाप्त झाल्याने व मजुर पुरवठा करण्याच्या कामासाठी आवश्यक मान्यता व निविदा प्रक्रियासाठी कालावधी लागणार असल्याने पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवा लक्षात घेता दि. ०१/१२/२०२४ ते २८/०२/२०२५ या कालावधी पर्यंत ३ महिन्यासाठी कुठलीही दरवाढ न करता मुदतवाढ व पाणी पुरवठा विभागास २० मजुर त्यासाठी येणाऱ्या रु. १९९८६७५/- मात्रचे खर्चास आयुक्त यांनी दि.२४/०९/२०२४ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानंतर ज.श.म.न.पा./पापुवि/२६५/२४-२५ दि. ०८/०१/२०२५ अन्वये मजूर पुरविणे कामी दि. ०१/१२/२०२४ ते २८/०२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तदनंतर आयुक्त यांचे दि. ०४/०४/२०२५ रोजीच्या मान्यतेने रु. १३,३२,४५०/- मात्रचे खर्चास व मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार शहर अभियंता यांचे पत्र क्र./पा.पु.वि/१४/ दि. १६/०४/२०२५ अन्वये मजूर पुरविणे कामी दि. ०१/०३/२०२५ ते ३०/०४/२०२५ पर्यंत मजूर पुरविणेचे प्रती दिन मंजूर दरानुसार कुठलीही दरवाढ न देता मुदतवाढ देणेत आली होती.

जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी वितरण व्यवस्थे कामी व्हॉलमन / मजूर पुरविणे कामी मनपाच्या पाणी पुरवठा करण्याचे कामास पत्र क्र. ज.श.म.न.पा./पापुवि/ २६५/२४-२५ हे मक्तेदार एस. के. कॉन्ट्रॅक्टर यांना देण्यात आलेले कामाची मुदत संपल्यानंतर वेळोवेळी मंजूर दरात कोणतीही दर वाढ न देता देण्यात आलेल्या मुदतीचा कालावधी ३० एप्रिल २०२५ रोजी समाप्त होत आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर कर्मचारी सेवानिवृत होत आहेत. अशा स्थितित कमी मनुष्यबळा अभावी या कालावधीत दैनंदिन कामे सुरळीत ठेवून नागरिकांना पाणी पुरवठा करणे ही अत्यावश्यक सेवा पुरविणे आवश्यक असल्याने तसेच येत्या दोन महिन्यात आचार संहिता लागू होण्याआधी व्हॉलमन / मजूर पुरवठा कामाची फेरनिविदा प्रक्रिया पूर्ण होवून कार्यादेश निर्गमित होईपावेतोच्या कालावधी पर्यंत मंजूर मक्तेदार मे. एस. के. कॉन्ट्रॅक्टर यांचे व्हॉलमन / मजूर पुरवठा करणाऱ्या कामास दि. ०१/०५/२०२५ पासून ३१/०८/२०२५ या कालावधी पर्यंत ४ महिन्यासाठी कुठलीही दर वाढ न करता मुदतवाढ देणेस व मंजूर दरानुसार म्हणजेच रक्कम ६३४.५० प्रती दिन / प्रती मंजूर या दरात पाणी पुरवठा विभागातील ३५ मजूर त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. २६,६४,९००/- मात्रच्या खर्चास म.न.पा. निधीतून पा. पू. व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशीर्षका अंतर्गत स्थायी समितीच्या वित्तीय मान्यता मिळणेसाठी उपअभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०९** **प्रशासक ठराव क्र.:-२९२** **दिनांक :-०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहरअभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम वि./ ४३१/२०२५ दि.३१/०७/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्यलेखापरिक्षक यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात सर्व साधारण रस्ता अनुदान योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०१ शिवाजी नगर फेडरेशन रस्त्यापासुन ते फायर ऑफिस पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे कामी मक्तेदार नॅशनल इंजिनिअरींग ॲण्ड कंन्सल्टंट यांचे निविदा रक्कमेपेक्षा १५.९३०% कमीचे दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहरअभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सर्व साधारण रस्ता अनुदान योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०१ शिवाजी नगर फेडरेशन रस्त्यापासुन ते फायर ऑफिस पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे कामास आयुक्त यांनी पत्र क्रं. सांबा/२०९०/२०२४ दि. २६/०९/२०२४ प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि २७/०९/२०२४ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं. ५३९ प्रसिध्द केली असता निविदा भरणे करिता दिलेल्या मुदतीत०७ ई- निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं. १ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असता त्यात एकुण ०६ निविदाकार पात्र असल्याने त्यांचे फोल्डर क्रं. २ उघडण्यात आले त्यात मक्तेदार तिरुपती कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा १४.१४ % कमीचे दर सर्वात कमी आले त्यामुळे त्यांची निविदा मंजुरीकरीता सादर केली असता त्यावेळेस त्यांनी सादर केलेल्या बिड कॅपीसीटी बाबत तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांना इतर शासकीय कार्यालयाकडील वर्कडन व वर्कींग हॅन्ड सर्टफिकेट मागणी नुसार प्राप्त झाल्यावरुन निविदा समितीने त्यानुसार गणिती करुन मक्तेदार तिरुपती कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेली बिड कॅपिसिटी कमी येत असल्याने निविदा समितीने दि. ०४/०४/२०२५ चे आदेशानुसार अपात्र ठरविण्यात आले त्यामुळे सदर कामी दुसऱ्या क्रमांकावर आलेले निविदाकार गौरव गणपत पाटील यांना सदरचे काम L१ आलेल्या मक्तेदार यांनी दिलेल्या दरात काम करण्यासंदर्भात चर्चे करीता निविदा समितीने बोलविले असता सदरचे काम मक्तेदार गौरव गणपत पाटील यांनी झालेल्या चर्चे अंती L१ आलेल्या मक्तेदाराच्या दरात काम करण्यास लेखीसंमती दिली त्यानुसार निविदा मंजुर करण्याची कार्यवाही सुरु असतांना मक्तेदार तिरुपती कन्स्ट्रक्शन यांनी L२ मक्तेदार यांचे बिड कॅपिसीटी संदर्भात तक्रार अर्ज दाखल केला. त्यानुसार मक्तेदार गौरव गणपत पाटील यांच्या कडुन तक्रार अर्जानुसार खुलासा मागविला असता मक्तेदार L२ यांनी दिलेल्या मुदतीत खुलासा सादर केलेला नसल्याने आयुक्त यांचे दि.११/०६/२०२५ मान्यतेनुसार सदर कामाची फेर ई-निविदा सुचना क्रं. ६०६ प्रसिध्द केली असता निविदा भरणे करिता दिलेल्या मुदतीत ०५ ई- निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं. १ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्यांची विस्तृत छाननी संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन छाननी केली असता निविदाधारक (१) सुधीर सुभाष कोकाटे(२) महेश शालीग्राम पाटील(३) अनिकेत मिलींद चौधरी यांना अपात्र ठरविण्यात आले आहे व खाली नमुद ०२ मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने निविदा समितीने सर्वानुमते शिफारस केली असुन आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार त्यांचे ई निविदा फोल्डर नं. २ दि.२८/०७/२०२५ रोजी ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्त्याची संगणकावर प्रिंन्ट प्रत काढुन घेण्यात आली असुन त्या नुसार ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२९५५९५५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | अनिल मुरलीधर सोनवणे | निविदा रक्कमेपेक्षा ३.९९९% कमीचे दराने | २८३७७४६/- |
| २ | नॅशनल इंजिनिअरींग ॲण्ड कंन्सल्टंट | निविदा रक्कमेपेक्षा १५.९३०% कमीचे दराने | २४८५०७१/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार नॅशनल इंजिनिअरींग ॲण्ड कंन्सल्टंट यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा १५.९३०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु २४८५०७१/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टीग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २४८५०७१.०० |
| ०२ | जि.एस.टी.१८% | ४४७३१३.०० |
| ०३ | कामगार विमा १% | २४८५१.०० |
| ०४ | टेस्टीग चार्जेस | २४५८५.०० |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ८०१९०.०० |
| | एकुण रु. | ३०,६२,०१०.०० |

सर्व कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३०६२०१०/-मात्र आहे. परंतु मक्तेदार नॅशनल इंजिनिअरींग ॲण्ड कंन्सल्टंट यांचे निविदा रक्कमेपेक्षा १५.९३०% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्तीनुसार १ ते १० टक्के कमीचे दरापर्यंत १ टक्का व त्यावरील ११ ते १५ टक्का पर्यंतच्या कमीचे दरास प्रति टक्याला १ टक्का व १६ ते त्यावरील टक्का पर्यंतच्या कमीचे दरास प्रति टक्याला २ टक्का याप्रमाणे परफार्मन्स सिक्युरिटी डि.डी. सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार नॅशनल इंजिनिअरींग ॲण्ड कंन्सल्टंट यांनी निविदा रक्कमेपेक्षा १५.९३०% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्या कडुन ८% परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन अनामत रक्कम रु.२४४९६१/- मात्रचा डि.डि. मनपा खजीन्यात सादर करण्या करीता मक्तेदार यांना पत्राद्वारे कळविले असता मक्तेदार यांनी मुदतित मनपा पावती क्रं.३१८४ दि.३०/०७/२०२५ रोजी रक्कम रु.२४४९६१/--मात्रचा डि.डी.क्रं.९००२३९ रक्कम रु.२४४९६१/-मात्रचा जमा केलेला आहे. तशी पावतीची छायांकीत प्रत जोडलेली असुन त्यानुसार सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३०,६२,०१०/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.३०,६२,०१०/- मात्र सर्वसाधारण रस्ता अनुदान योजने अंतर्गतच्या निधीतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदारनॅशनल इंजिनिअरींग ॲण्ड कंन्सल्टंट यांचे निविदा रक्कमेपेक्षा १५.९३०% कमीचे दर स्विकारण्यास मनपा निविदा समिती यांची सर्वानुमते शिफारस होवुन सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३(क) नुसार स्थायी समिती / प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-१०** **प्रशासक ठराव क्र.:-२९३** **दिनांक :- ०१/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता,प्रकल्प विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./ प्रकल्प विभाग/ ७३/२०२५ दि.३१/०७/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि. ३०/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्यलेखापरिक्षक यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत घनकचरा प्रक्रिया उभारणी करून आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट सुविधा उभारणे कामी ई-निविदा क्र.५९८/२०२५ नुसार रॉयल वेस्टन एलएलपी यांचे प्राप्त निविदा दरास मान्यता देणेबाबत.

वाचा क्र.१ व शहरअभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत घनकचरा प्रक्रिया उभारणी करून विल्हेवाट सुविधा उभारणे कामी ई-निविदा क्रं.५९८ रक्कम रु.१३,७५,८४,५०८ मात्र राष्ट्रीय स्तरावर दैनिक हिंदुस्तान टाईम्स,दैनिक टाइम्स ऑफ इंडीया, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक नवभारत दि.१०.०५.२०२५, या राष्ट्रीय वृत्तपत्रातून तसेच राज्यतस्तरीय आवृत्तीत मराठी भाषेतून प्रसिध्दीस दिलेली होती.

सदर कामाची मुदत ही दि.०९.०५.२०२५ ते दि.०५.०६.२०२५ रोजी पर्यंत होती. त्यानुसार निविदेचा तांत्रिक लिफाफा क्रं.०१ शहर अभियंता यांच्या समक्ष उघडण्यात आला. सदर मुदतीत संगणकाद्वारे एकूण ०५ ई- निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार लिफाफा क्रं.०१ तांत्रिक कागदपत्र ही सल्लागार ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या मार्फत छाननी करण्यात आली आहे. सदर कामी प्रकल्प सल्लागार यांनी दिनांक २५.०६.२०२५ रोजी दिलेल्या तांत्रिक छाननी अहवालानुसार प्राप्त ०५ निविदाधारकांपैकी ०२ निविदाधारक यांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली असल्याने निविदाधारक क्र. ०१ मे. आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली व निविदाधारक क्र. ०२ रॉयल वेस्टन एलएलपी यांना निविदा समिती समोर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यासाठी दिनांक १४.०७.२०२५ रोजी सकाळी १२ वाजता बोलवण्यात आलेले होते. त्यानुसार निविदाधारक क्र.०१ मे. आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली व निविदाकार क्र.०२ रॉयल वेस्टन एलएलपी यांच्याकडून निविदा समिती समोर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. सदर निविदाधारकांनी केलेल्या प्रकल्प सादरीकरणाच्या आधारावर प्रकल्प सल्लागार ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या मार्फत निविदाधारकांकडून सादरीकरण झाल्या नंतर छाननी करण्यात आलेली आहे. सदर छाननी अहवाल दिनांक १४.०७.२०२५ रोजी प्राप्त झालेला आहे. अहवालानुसार प्राप्त मुल्यांकनानुसार खालील गुण प्राप्त झाले आहे.

| अ क्र | मक्तेदाराचे नाव | प्राप्त गुण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली | ७५ | वित्तीय देकार उघडण्यास पात्र |
| २ | रॉयल वेस्टन एलएलपी | ९० | वित्तीय देकार उघडण्यास पात्र |

त्यानुसार निविदाधारक क्र.०१ मे. आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली व निविदाकार क्र.०२ रॉयल वेस्टन एलएलपी यांचा लिफाफा क्र.०२ वित्तीय देकार उघडण्यास निविदा समितीने दिनांक १४.०७.२०२५ रोजी च्या निर्णयानुसार शिफारस केली होती. त्यानुसार दिनांक २५.०७.२०२५ रोजी वित्तीय देकार उघडण्यात आले आहे. त्यानुसार वित्तीय देकार प्राप्त निविदाधारकांची छाननी प्रकल्प सल्लागार ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या मार्फत करण्यात आलेली असून त्याचा रीपोर्ट दिनांक ३१.०७.२०२५ रोजी प्राप्त झाला आहे.

| Sr.No | Particulars | M/s Aadarsh Bharat Enviro Pvt.Ltd | M/s Royal Westn Projects LLP and M/s Jan Adhar Sevabhavi Sanstha |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | Techinical Score of the bidder (out of maximum of १०० marks (st) | ७५.०० | ९०.०० |
| २ | Techinical Weightage (Tw) | ०.७० | ०.७० |
| ३ | Financial Quote (F) | | |
| I | BOQ १ | १३,७०,३४,१६९.९७ | १३,६२,०८,६६२.९२ |
| Ii | BOQ २ | ९,९०,९७,५००.०० | ९,६७,९८,०००.०० |
| | Total Financial Quote(F) | २३,६१,३१,६६९.९७ | २३,३०,०६,६६२.९२ |
| ४ | Lowest financial proposal (Fm) | २३,३०,०६,६६२.९२ | २३,३०,०६,६६२.९२ |
| ५ | Financial score (Sf) = १०० x Fm/F | ९८.६८ | १०० |
| ६ | Financial Weightage (Fw) | ०.३० | ०.३० |
| | Total score (QCBS ७०:३०) = St x Tw x Sf x Fw | ८२.१० | ९३.०० |
| | Bidder Ranking | H२ | H१ |

त्यानुसार तुलनात्मक तक्ता BOQ १

| अ क्र | निविदा धारकांचे नाव | निविदा रक्कम रु १३,७५,८४,५०८ | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १ | मे. आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली | निविदा रक्कमेपेक्षा ०.४०% कमीचे दराने | १३,७०,३४,१६९.९७ |
| २ | रॉयल वेस्टन एलएलपी | निविदा रक्कमेपेक्षा १ % कमीचे दराने | १३,६२,०८,६६२.९२ |

तुलनात्मक तक्ता BOQ २

| अ क्र | निविदा धारकांचे नाव | निविदा रक्कम रु १०० per ton (O AND M cost per ton per year) QTY १०९५०० Ton | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १ | मे. आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली | ९०५ per ton | ९९०९७५०० |
| २ | रॉयल वेस्टन एलएलपी | ८८४ per ton | ९६७९८००० |

सदर सल्लागार यांच्या कडून प्राप्त रिपोर्टनुसार रॉयल वेस्टन एलएलपी (Score: ९३.००)→ *सर्वाधिक गुण मिळवलेला H१ Bidder मे.* आदर्श भारत इनव्हारो प्रा.ली (Score: ८१.१०) →*H२ Bidder प्राप्त झालेले आहे. रॉयल* वेस्टन एलएलपीने सर्वोच्च गुण मिळवले आहेत, त्यामुळे त्यांची प्रथम क्रमांकावर निवड होऊन रॉयल वेस्टन एलएलपी ने भरलेला दर BOQ१ मध्ये रु.१३,६२,०८,६६२.९२/- व BOQ२ मध्ये भरलेले दर रु. ९,६७,९८,०००.००/- असे एकूण दर रु.२३,३०,०६,६६२.९२/- आलेले आहे. तरी रॉयल वेस्टन एलएलपी - H१ यांचे दर निविदा रक्कमपेक्षा १% कमीचे दरास मान्यते करिता समिती ने शिफारस केलेली असून सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३(क) नुसार स्थायी समिती/प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-११** **प्रशासक ठराव क्र.:-२९४** **दिनांक :- ०१/०८/२०२५**

**वाचा** :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.०१ दि.२१/०४/२०२५ अन्वये आरोग्य विभाग अंतर्गत प्र.०४ वॉर्ड क्र.१० येथील कुंभारवाडा, महादेव मंदिर विहीरीवरील नादुरुस्त पंप व स्टार्टर दुरुस्त करणेकामी मक्तेदार श्री.मे.प्रशांत एन्टरप्राईजेस, शॉप नं.४ यश प्लॉझा कॉम्प्लेक्स,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२१,२७४/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.०२ दि.२८/०४/२०२५ अन्वये मशिनरी विभागातील वाघुर मुख्य जलवाहिनीवरील फ्लो मिटर, डाटा लॉगर दुरुस्त करणे, नवीन सिग्नल केबल पुरवणे व बसविणे कामी मक्तेदार मे.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१,८४,८२५/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.०३ दि.२२/०४/२०२५ अन्वये पा.पु.मशिनरी विभागाकडून शहरातील अत्यावश्यक सुविधेच्या कामासाठी सुटे भाग व कर्मचाऱ्यांचया सुरक्षेकरीता आवश्यक साहीत्य पुरविणे कामी मक्तेदार श्री.मे.प्रशांत एन्टरप्राईजेस, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२,९०,३१६/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.०४ दि.२८/०४/२०२५ अन्वये मेहरुणगांव व रामेश्वर कॉलनी येथील जलकुंभ भरणा करणेसाठी बसविण्यात येणाऱ्या ७५ एचपी वीज पंप म.रा.वि.वि. कंपनीचे १.३% सुपर व्हीजन योजने अंतर्गत वीज कनेक्शन घेणेकामी साहित्य पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.माऊली इन्फ्रा अँड इलेक्ट्रीकल, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.४,८७,७७९/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.०५ दि.२९/०४/२०२५ अन्वये पा.पु.विभागाकडील पंप हाऊस व जलशुध्दीकरण केंद्र येथील सबस्टेशन मधील रोहीत्र व विदयुत संच मांडणी करीता अनुक्रमे ऑईल व उपकरणे पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.न्यु.आर.के. इलेक्ट्रीकल, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२,९०,५६३/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.०६ दि.२९/०४/२०२५ अन्वये पा.पु.विभागाकडील वाघुर पंप हाऊस येथील विदयुत उपकरणे दुरुस्त करणे व इन्वर्टर पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.न्यु.आर.के. इलेक्ट्रीकल, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२,७८,५७०/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.०७ दि.२९/०४/२०२५ अन्वये वाघुर पंप हाऊस व उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथील विदयुत उपकरणे संलग्नीत साहीत्य पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.वरद इले.वर्क्स, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९९,७९७/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.०८ दि.०८/०५/२०२५ अन्वये प्रभाग क्र.२ महाराष्ट्र राज्य वखार मंडळ परिसरात बारसे कॉलनी जवळ नागोरी डेअरी समोर मदिना कॉलनी तसेच उस्मानीय पार्क रोडवर ११० मीमी एचडीपीई पाईप लाईन टाकणे कामी मक्तेदार श्री.हितेश रविंद्र बारी, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२,९७,०३३/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.०९ दि.०८/०५/२०२५ अन्वये प्रभागा अंतर्गत शिवाजीनगर, उस्मानिया पार्क वाढीव परीसर, के.जी.एन.पार्क, बाबानगर, नागोरी चहा, परफेक्ट टेलर तसेच नंदीनी कॉलनी भागात पिण्याचे पाणी वितरण करणे कामी मक्तेदार श्री.हितेश रविंद्र बारी, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७,९६,४३३/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.१० दि.०९/०५/२०२५ अन्वये पा.पु.झोन क्रं.११ अंतर्गत महालक्ष्मीपार्क परिसरात अमृत पाणी पुरवठा सुरु करणे करीता नवीन अमृत पाईप लाईन व व्हॉल दुरुस्तीकामी साहीत्य पुरविणे कामी मक्तेदार श्री.हितेश रविंद्र बारी, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.३,२५,३०५/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.११ दि.०३/०६/२०२५ अन्वये शाहूनगर झोपडपट्टी मध्ये १० मीमीचे २ स्लुईस व्हॉल बसविणे, पुरविणे व किरकोळ साहित्य खरेदी करणे कामी मक्तेदार प्रशांत एंटरप्राईजेस, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५१,८६२/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र.१२ दि.२४/०६/२०२५ अन्वये शाहूनगर युनिट अंतर्गत वॉर्ड क्रं.७ मध्ये १२५ मीमी नवीन व्हॉल पुरविणे कामी व साहीत्य पुरविणे (गजानन कॉलनी, प्रभुदेसाई कॉलनी) कामी मक्तेदार मे.प्रशांत एंटरप्राईजेस, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५९,७९०/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र.१३ दि.२४/०६/२०२५ अन्वये उमाळा जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी शुध्दीकरणासाठी PAC (पावडर) खरेदी करणे कामी मक्तेदार श्री.सचिन भीमराव चौधरी, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२,८३,२५०/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र.१४ दि.२४/०६/२०२५ अन्वये शासन निर्णय क्रं./एफएफसी २०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ दि.२८/१०/२०२० व महासभा ठराव क्रं.१४७ दि.०९/०८/२०२४ अनुषंगाने १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधी अंतर्गत a) Drinking Water बंधनकारक अनुदान (Tied Gants) नुसार महानगरपालिकेस प्राप्त निधीतील ५०% निधी अंतर्गत पाणी पुरवठा बिगर सिंचन पाणी आरक्षण वापराचे थकीत रक्कमेपैकी निव्वळ पाणीपट्टी रक्कमेची अदायगी करणे कामी एकूण रक्कम रु.५,४३,२५५/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र.१५ दि.०७/०७/२०२५ अन्वये शहरातील नागरीकांच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या ठिकाणावरील पा.पु. सुरळीत करणेकामी नवीन पंप खरेदी व अस्तित्वातील पंपाची दुरुस्ती करणे कामी मक्तेदार मे.न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल्स, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९६,१६५/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र.१६ दि.०८/०७/२०२५ अन्वये उंच जलकुंभाचे लेव्हल इंडिकेटर दुरुस्तीसाठी आवश्यक सामान पुरविणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.४८,२१६/- मात्र खर्चाची संविदा.

१७. प्रशासकीय आदेश क्र.१७ दि.०८/०७/२०२५ अन्वये रायसोनी नगर पाण्याची टाकी, नित्यानंदनगर पाण्याची टाकी, श्रध्दा कॉलनी, नेहरुनगर इतर परिसरातील ठिकठिकाणी व्हॉलच्या चाब्या बनविणे कामी मक्तेदार मे.मॅग्नम इंजिनिअरींग वर्क्स., जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.३५,०००/- मात्र खर्चाची संविदा.

१८. प्रशासकीय आदेश क्र.१८ दि.०८/०७/२०२५ अन्वये खंडेराव नगर झोन मधील वाढीव भागासाठी पाईपन लाईन टाकणे कामी मक्तेदार श्री.हितेश रविंद्र बारी, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,७५,४७२/- मात्र खर्चाची संविदा.

१९. प्रशासकीय आदेश क्र.१९ दि.२३/०७/२०२५ अन्वये सुप्रिम कॉलनी मधील सम्पवेल मधील बांधकामाच्या साहीत्याचा व इतर गाळ काढणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील लिलाधर फेगडे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१,५२,४३७/- मात्र खर्चाची संविदा.

२०. प्रशासकीय आदेश क्र.२० दि.२४/०७/२०२५ अन्वये वाघुर पंपींग स्टेशन येथे मोटार कुलींग करीता व आपात्कालीन परीस्थीतीत प्रकाश व्यवस्थेत साहीत्य खरेदी करणे कामी मक्तेदार मे.न्यु. आर.के.इले., जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७४,०१४/- मात्र खर्चाची संविदा.

२१. प्रशासकीय आदेश क्र.२१ दि.२४/०७/२०२५ अन्वये महानगरपालिका टी.बी.एस. रुग्णालय येथे कुत्रे निर्जिनीकरणसाठी शस्त्रक्रियागृह येथे व आवारात पाण्याची व्यवस्था करणे कामी मक्तेदार मे.न्यु. आर.के.इले., जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५३,८४६/- मात्र खर्चाची संविदा.

२२. प्रशासकीय आदेश क्र.२२ दि.२४/०७/२०२५ अन्वये पा.पु.विभागातील सम्पवेल, उंच जलकुंभासाठी लेव्हल इंडीकेटर, लाईटनिंग अरेस्टर तसेच दुरुस्तीसाठी आवश्यक सामान पुरविणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१,१५,०५७/- मात्र खर्चाची संविदा.

२३. प्रशासकीय आदेश क्र.२३ दि.२५/०७/२०२५ अन्वये झोन क्र.१० ममुराबाद रोड वरील लेंडी नाला पुलावर ३१५ मीमी व २२५ मीमी पाईपलाईन नव्याने करण्यासाठी एम.एस.पाईप व्हॉल व आवश्यक साहित्य पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,६३,००५/- मात्र खर्चाची संविदा.

२४. प्रशासकीय आदेश क्र.२४ दि.२५/०७/२०२५ अन्वये पाणी पुरवठा अंतर्गत, प्रभाग क्र.१ (शिवाजी नगर) गेंदालाल मिल व झोन क्र.११ जुना खेडीरोड परिसरमध्ये अमृत योजनेचे पाईप लाईन वाढविणे व आवश्यक साहित्य पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,०५६/- मात्र खर्चाची संविदा.

२५. प्रशासकीय आदेश क्र.२५ दि.२५/०७/२०२५ अन्वये रामेश्वर कॉलनी, मेहरुण येथील ३० लक्ष ली. क्षमतेची उंच टाकी भरणे कामी फॅब्रीकेटेड पंप रुमचे काम करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय किशोर राणे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,२४,१९२/- मात्र खर्चाची संविदा.

२६. प्रशासकीय आदेश क्र.२६ दि.२५/०७/२०२५ अन्वये वाघुर मेन लाईन करिता २०० मीमी एयर व्हॉल व स्लुईस व्हॉलचा पुरवठा करणे व बसविणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,८३,६८९/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**